दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार १२ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २३९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# लीड मिळाले नाही तर: सरपंचांचा हिशोब घेणार, नितेश राणे

## सरपंचांसहित कार्यकर्त्यांनी आपल्या निवडणुकांच्या वेळी जी यंत्रणा राबविली तीच यंत्रणा आता लावा. येत्या ४ जूनला सगळ्या सरपंचांचा हिशोब घेणार आहे.




**वादळवार्ता/ शिरूरकासार**

लोकसभा निवडणुकीत पहिल्या टप्प्यातील मतदान जवळ आले आहे. एकीकडे प्रचाराचा धडका सुरु असताना महायुतीकडून काही जागांवर उमेदवार दिला गेला नाही. ठाणे, सिंधुदुर्ग, कल्याण, नाशिक येथील जागेवर महायुतीचा उमेदवार नाही. सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघातून केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. या जागेवर शिवसेनेकडून दावा केला जात असल्यामुळे अद्याप उमेदवारी जाहीर केली गेली नाही. परंतु नारायण राणे यांनी प्रचार सुरु केला आहे. आता या प्रचार दरम्यान नारायण राणे यांचे पुत्र नितेश राणे यांनी सरपंचांना सज्जड दमच भरला आहे. सर्वांचा हिशोब ४ जूनला होणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. नितेश राणे यांच्या या वक्तव्यावरुन वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. काय म्हणाले नितेश राणे सिंधुदुर्गमधील कणकवलीमध्ये नितेश राणे यांच्या नेतृत्वाखाली भाजपचा कार्यकर्ता संवाद मेळावा झाला. या मेळाव्यात बोलताना आमदार नितेश राणे यांनी सरपंचांना सज्जड दम दिला आहे. ते म्हणाले की. सरपंचांसहित कार्यकर्त्यांनी आपल्या निवडणुकांच्या वेळी जी यंत्रणा राबविली तीच यंत्रणा आता लावा. येत्या ४ जूनला सगळ्या सरपंचांचा हिशोब घेणार आहे. मला हवा तसं लीड मिळालं नाही तर मागणी असलेला निधी मिळणार नाही. मग मात्र माझी तक्रार करू नका, असा दम नितेश राणे यांनी भरला.नारायण राणे यांचा उद्धव ठाकरेंवर हल्ला केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्यावर जोरदार टीका केली. नारायण राणे म्हणाले, संजय राऊत वेडा झालाय. खरच वेडा झालाय. मोदी साहेब म्हणे उद्धव ठाकरेंना घाबरतात. तुमचे पाच खासदार आणि मोदी साहेब यांना घाबरणार. अतिरेकी कारवाया करणाऱ्या शेजारच्या देशांना मोदींनी सांगितलय अतिरेकी कारवाया कराल तर घुसून मारू....असे आमचे मोदी साहेब. मग या शेंबड्या उद्धव ठाकरेला मोदी घाबरणार का? उद्धव ठाकरे यांना फार मस्ती चढली आहे. त्यांचे खासदार किती पाच आणि भाजपचे ३३०. त्यांना मी ३९ वर्षे जवळून पाहिलाय. अडीच वर्ष ते मुख्यमंत्री होते. त्यावेळी मंत्रालयात फक्त दोन वेळा आले. बाकीच्यावेळी मातोश्रीत कडी लावून खोलीत बसले होते. आता ते फुशारक्या मारतात. वाकडे तिकड संजय राऊत किंवा उद्धव ठाकरे बोलल्यास परत जायला देणार नाही, असे राणे म्हणाले.

## वडवणी तालुक्यात अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांची लागली कुपाट





**वादळवार्ता/वडवणी**

(बातमीदार): वडवणी तालुक्यात काल गुरुवारी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे तालुक्यातील चिंचवण, कोठारबन, वडवणी, साळींबा यासह तालुक्यातील शेतकऱ्यांच्य शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तरी शासनाने तात्काळ पंचनामे करून आर्थिक नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. वडवणी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून ढगाळ व पावसाचे वातावरण असून यामध्ये वादळ वारा हि सुटला असुन यामध्ये काल गुरूवार रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्यासह पाऊस व गारपिटीमुळे तालुक्यातील डोंगर पट्ट्यातील चिंचवण, कोठारबन, वडवणी, साळींबा यासह तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील ज्वारी, बाजरी, गहू, आंबा, टरबूज, खरबूज, डाळिंब यासह इतर पिकांचे व भाजीपाला यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी आणखी आर्थिक संकटात सापडला असून महसूल विभागाने तात्काळ नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे..

## नगर परिषद कार्यालय येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांना जयंती निमित्त अभिवादन



**वादळवार्ता/परळी वैजनाथ**

परळी नगर परिषद कार्यालय येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला उपमुख्यधिकारी संतोष रोडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

परळी वैजनाथ नगर परिषद कार्यालय येथे गुरुवार दि. ११ एप्रिल रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. सामाजिक समतेचा संदेश देणारे आणि...शिक्षणाचा उपयोग करून सर्वांना खरेखुरे स्वातंत्र्य मिळवून देणारे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमुख्यधिकारी संतोष रोडे यांच्यासह सर्व विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थितीत होते.

## माझ्या सारख्या शेतकरी पुत्रावर टीका करणे, हे पालकमंत्र्यांना शोभत नाही-बजरंग सोनवणे



**वादळवार्ता/बीड**

मी अत्यंत साध्या व गरीब शेतकरी कुटुंबातील आहे. माझे आई - वडील हे शेतकरी असल्याने मी शेतकरी पुत्र आहे. माझ्या सारख्यावर राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी टिका करणे. हे त्यांना शोभत नाही, असा टोला बजरंग सोनवणे यांनी लगावला.

बीडचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यावर टीका केली. त्यावर बोलताना सोनवणे म्हणाले की, बीड लोकसभेची निवडणूक ही विकासाच्या मुद्द्यावर व्हायला पाहिजे. मात्र विरोधक हे दुर्दैवाने जातीचे मुद्दे पुढे आणत आहेत. त्यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे ना, त्यांचा मतदारांशी संपर्क आहे . विद्यमान खासदारांनी त्यांच्या १० वर्षाच्या कार्यकाळात किती निधी विकास कामासाठी खर्च केला हे आता एक कोडेच झाले आहे . त्यांच्या अकार्यक्षमतेमुळे भाजपवर उमेदवार बदल्याची वेळ आली. तर आजी - माजी पालकमंत्र्यांनी कोणताच प्रकल्प आणला नाही. म्हणून ते माझ्यावर अवास्तव टीका करून विकासाच्या मुद्यावरून सर्वसामान्यांचे लक्ष विचलित करण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. मात्र पालकमंत्र्यांनी माझ्यावर टीका करणे हे त्यांना शोभत नाही असा प्रति टोला ही बजरंग सोनवणे यांनी लगावला.

## सौ सविता पाटील यांना नारीशक्ती पुरस्काराने सन्मानीत .



**कवि सरकार इंगळी**

सौ सविता महावीर पाटील कोल्हापूर महाराष्ट्र राज्य पोलिस मित्र संघटना कोल्हापूर जिल्हा उपसंघटक यांना राजेश चौगुले फौंडेशन अंकलकोप येथील संस्थेचा नारी शक्ती पुरस्कार देऊन मान्यवरांचे हस्ते सन्मानीत करण्यात आले .

यावेळी सौ शितल राजेश चौगुले सामाजिक कार्यकर्त्या , सौ निलिमा लिमचे प्रा सौ कविता म्हात्रे ‘ मा राजेश चौगुले श्रीमती राजेश्वरी सावंत ‘ सौ विद्या पाटील ‘ सुखदा सावंत ‘ सुरय्या तांबोळी ‘ पल्लवी सुर्यवंशी आदि मान्यववंचे हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले . यावेळी सर्व सदस्य राजेश चौगुले फौंडेशन अंकलकोप व ग्रामस्थची उपस्थिती होती .

## स्वार्थापोटी भूमिका बदलणा-या नेत्यांना जनता त्यांची जागा दाखवून देणार-आ. संदीप क्षीरसागर



**वादळवार्ता/बीड**

बीड जिल्ह्यातील अनेक नेते हे शरदचंद्र पवार साहेबांच्या जीवावर मोठे झाले. स्वार्थापोटी त्यांना धोका देऊन गेले. मात्र अशा भूमिका बदलून स्वार्थापोटी जनतेला सोडून देणाऱ्या नेत्यांना बीड जिल्ह्यातील जनता त्यांना त्यांची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही. असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड येथे ईदनिमित्त मुस्लिम बांधवांच्या घरी गाठी भेटी घेत असताना व्यक्त केला.

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी रमजान ईद या पवित्र सणानिमित्त बीड शहरातील मुस्लिम बांधवांना भेटून शुभेच्छा दिल्या. त्यांच्या निवासस्थानी जाऊन फराळाचा आस्वाद घेतला.

यावेळी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना आ. संदीप क्षिरसागर म्हणाले की, बीड जिल्हा हा शरद पवार साहेब यांच्या विचारांवर व त्यांच्यावर प्रेम करणारा जिल्हा आहे. जिल्ह्यातील अनेक नेते त्यांच्या जीवावर मोठे झाले, परंतु स्वार्थापोटी पक्ष बदलून भाजपात गेले. असे उत्तर त्यांनी भाजपात गेलेल्या आमदारांबद्दल विचारलेल्या प्रश्नाला दिले. मात्र या जिल्ह्यातील मतदार सुज्ञ व हुशार आहेत. त्यांच्या स्वार्थी व धोका देण्याच्या प्रवृत्तीवर मतदार व जिल्ह्यातील जनतेची नाराजी आहे. त्यांच्या बदललेल्या भूमिकेला जनता कधीही पाठिंबा देणार नसून भूमिका बदलणाऱ्यांना त्यांची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही. असे स्पष्ट मत संदीप क्षीरसगर यांनी व्यक्त केले.

संपादकीय

# !! समर्थ स्वामी जय जय स्वामी समर्थ !!

(अक्कलकोट स्वामी समर्थ प्रकटदिन सप्ताह.)

"सबसे बडा गुरू... गुरूसे बडा गुरू का ध्यास... और उससे भी बडे श्री स्वामी समर्थ महाराज...!" तसेच स्वामी महाराजांनी त्यांच्या भक्तांना अभयदान दिले, "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे...!" अशा शब्दांमधे स्वामी समर्थांची महती वर्णन केली जाते. सदर ज्ञानवर्धक संकलित माहिती श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांत वाचा... संपादक.

श्री स्वामी समर्थ अर्थात अक्कलकोट स्वामी हे आपल्या २२ वर्षांचे आयुष्य जगले, ते इसवी सनाच्या १९व्या शतकात होऊन गेले, महाराष्ट्रातील अक्कलकोट येथे खूप काळ वास्तव्य केलेले श्रीपाद वल्लभ व श्रीनृसिंह सरस्वती यांच्या नंतरचे भगवान श्रीदत्तात्रेयांचे ते तिसरे पूर्णावतार आहेत, अशी मान्यता आहे. गाणगापूरचे श्री नृसिंह सरस्वती हेच नंतर श्रीस्वामी समर्थांच्या रूपाने प्रकट झाले. "मी नृसिंह भान असून श्रीशैलम्‌जवळील कर्दळी वनातून आलो आहे" हे स्वामींच्या तोंडचे उद्‌गार ते नृसिंह सरस्वतींचा अवतार असल्याचे सुचवतात. विविध ठिकाणी स्वामी विविध नावांनी वावरले. स्वामी समर्थ हे विद्यमान आंध्रप्रदेशातल्या श्री शैल्यम क्षेत्राजवळील कर्दळीवनातून प्रकट झाले. त्यांनी तेथून आसेतुहिमाचल भ्रमण केले. इ.स.१८५६च्या सुमारास स्वामी समर्थ अक्कलकोटास आले. मंगळवेढ्याहून पहिल्यांदा जेव्हा ते अक्कलकोट नगरीत प्रवेशले, तेव्हा त्यांनी गावातील खंडोबा मंदिरात मुक्काम केला. तो दिवस चैत्र शुद्ध द्वितीया, शके १७७८, अनल नाम संवत्सरे, रविवार दि.०६ एप्रिल १८५६ हा होता.

इ.स.१८७५ सालच्या सुमारास महाराष्ट्रात जेव्हा मोठा दुष्काळ पडला होता, तेव्हा क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी आले होते, त्या वेळी त्यांनी फडक्यांना सध्या लढायची वेळ नाही असा सल्ला दिल्याचे सांगितले जाते. इ.स.१४५९मध्ये, माघ वद्य १, शके १३८० या दिवशी श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांनी गाणगापूरास निर्गुण पादुका स्थापन केल्या व त्यानंतर शैलयात्रेचे निमित्त साधून ते कर्दळीवनात अदृश्य झाले. या कर्दळी वनात सुमारे ३०० वर्षे महाराजांनी कठोर तपश्चर्या केली. या काळात मुंग्यांनी त्यांच्यावर वारूळ रचले. एके दिवशी उद्धव नावाचा लाकूडतोड्या त्याच कर्दळीवनात लाकडे तोडीत असताना त्याच्या हातून कुऱ्हाड निसटली व ती वारुळावर पडली. उद्धवाचे निमित्त साधून स्वामी महाराजांना पुन्हा भक्तांच्या कल्याणासाठी प्रगट व्हायचे होते. कुऱ्हाड वारुळावर पडताच त्यातून रक्ताची धार उडाली व क्षणातच दिव्य प्रकाश पडून उद्धवासमोर एक आजानुबाहू तेजस्वी मूर्ती प्रगट झाली; तेच अक्कलकोटचे स्वामी समर्थ महाराज होत. आपल्या हातून या महापुरुषाला जखम झाली अशा विचाराने उद्धवाला दुःख झाले व भय वाटू लागले; पण भक्तांसाठी माताच असलेल्या महाराजांनी उद्धवाला अभय व आशीर्वाद देऊन गंगातीरी प्रयाण केले. गंगातीरावर भ्रमण करता करता ते कलकत्त्यास गेले व तेथे त्यांनी महाकाली मातेचे दर्शन घेतले. नंतर काशी, प्रयाग असे भ्रमण करीत ते उत्तरेकडून दक्षिणेस आले. श्री स्वामी समर्थ पंढरपूर, मोहोळ असे भ्रमण करीत सोलापुरास आले. त्यानंतर मंगळवेढे नामक गावास स्वामींनी काही काळ वास्तव्य केले व तिथल्या भक्तांना विविध स्तरावर मार्गदर्शन केले. भेटेल त्याला आपल्या लीलेने आगळ्यावेगळ्या पद्धतींनी दुःखमुक्त करून कार्यरत केले. श्री सद्गुरू रामानंद बिडकर महाराज यांना स्वामींची दीक्षा मिळाली. ते फार मोठे शिष्य होऊन गेले आहेत. इसवी सन १८५६मध्ये स्वामी महाराजांनी अक्कलकोटमध्ये प्रवेश केला व तिथल्या त्यांच्या बावीस वर्षांच्या वास्तव्यात अक्कलकोट हे तीर्थक्षेत्र झाले. येथे त्यांनी जगातील अनेक मान्यवरांना मार्गदर्शन केले. स्वामी समर्थांनी अनेकांना कामाला लावून इसवी सन १८७८मध्ये त्यांचा एक आविष्कार संपविला असे नाटक केले आहे. स्वामी महाराजांचे अवतार कार्य आजही सुरू आहे. स्वामींनी अवतार कार्य संपवलेले नाही. स्वामी समर्थ महाराज आजदेखील भक्तांच्या पाठीशी सतत राहून त्यांना मार्गदर्शन करून कार्य करीत आहेत व अनंतकाळपर्यंत करीत राहतील, अशी त्यांच्या भक्तमंडळींची श्रद्धा व विश्वास आहे. आजही श्री स्वामी समर्थ महाराज जो-जो भेटेल त्याचा उद्धार अनेक मार्गातून करत आहेत. श्री स्वामी समर्थ महाराज यांनी रविवार दि.३० एप्रिल १८७८ रोजी (चैत्र वद्य त्रयोदशी, शके १८००, बहुधान्य नाम संवत्सर अक्कलकोट येथे "वटवृक्ष समाधी मठ स्थानी" माध्याह्नकाली आपल्या अवतारकार्याची समाप्ती केल्याचे नाटक केले व नंतर श्री स्वामी समर्थ यांना त्यांचे परम शिष्य चोळप्पा यांच्या निवासस्थानाजवळ समाधिस्थ करण्यात आले. त्यानंतर स्वामी महाराज पुन्हा कर्दळी वनात लुप्त झाले. !! अक्कलकोट श्री स्वामी समर्थ यांच्या पावन चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम !!

**संतचरणरज: बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.**
**वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज चौक,**

# नागझरी गावाचा श्रीक्षेत्र म्हणून लौकिक!

[संतशिरोमणी गोमाजी महाराज यात्रोत्सव विशेष.]

श्री गजानन महाराजांना वंदनीय असलेले संत गोमाजी महाराज होत. ते भगवान श्रीकृष्णाचे निस्सीम भक्त होते. शेगावचे संत श्री गजानन महाराज हे देखील ज्यांना वंदन करायचे, असे विदर्भातील थोर संत म्हणून श्री गोमाजी महाराज यांचा परिचय आहे. श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येणाऱ्या शेगावीच्या गजानन महाराज यांच्या पालखीचा पहिला मुक्काम श्री गोमाजी महाराज संस्थान नागझरी येथे असतो. आज या संत गोमाजी महाराज यांचा वार्षिक यात्रोत्सव आहे. अधिक माहिती श्रीकृष्णदास निरंकारी- बापू यांच्या सदर लेखातून वाचा... संपादक.

श्री क्षेत्र शेगांवपासून अवघ्या ६ किलोमीटरवर मन नदीच्या तीरावर श्रीक्षेत्र नागझरी वसलेले आहे. येथे श्री संत गोमाजी महाराजांचे समाधी मंदिर आहे. श्री नागेश्वराचे पुरातन मंदिर आणि अखंड झुळझुळणारे पाण्याचे पवित्र झरे यामुळे या गावाला "नागझरी" हे नाव मिळाले. श्री गोमाजी महाराज कृष्णभक्त होते, पण त्यांची पंढरपूरच्या विठ्ठलावर प्रगाढ श्रद्धा होती. शेगाव येथून श्री संत गजानन महाराज यांची पालखी दरवर्षी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवते. त्यानंतर पालखीचा पहिला मुक्काम याच नागझरी मंदिर परिसरात असतो. संत श्री गजानन महाराज हे देखील पंढरपूर येथे वारीसाठी जाताना नागझरी इथं आवर्जून थांबायचे आणि संत श्री गोमाजी महाराज यांचे दर्शन घ्यायचे, असे भाविक सांगतात. गोमाजी महाराजांनी गजानन महाराजांच्या रुपात पुन्हा अवतार घेतला, असेही भक्त मानतात. श्री गजानन विजय या ग्रंथामध्ये गोमाजी महाराजांच्या सर्व लीला संकलित केल्या आहेत. संतश्रेष्ठ गोमाजी महाराज यांच्यावरील एक आरती प्रसिद्ध आहे. त्यात त्यांनी केलेल्या अनेक लीलांचा समावेश आहे. त्यांच्यामुळे नागझरी येथे जणू पंढरी अवतरली, अशी कल्पना मांडण्यात आली आहे. त्यामुळे गोमाजी महाराज यांचा जनमाणसावरील प्रभाव आणखी ठळक होतो.

"जयजयाजी महाराज जयजय सद्‌गुरू गोमाजी।
भावभक्तीनें विठ्ठल तुम्हीं ठेवियला राजी।।"
(संत गोमाजी महाराज आरती: चरण क्र. १ व २.)

संतशिरोमणी गोमाजी महाराज हे कोण? ते कोठून आले? नागझरी येथे त्यांचे कसे वास्तव्य झाले? याबद्दल ठोस अशी माहिती उपलब्ध नाही. पण, काही भाविकांच्या मते, करंजपूर-कारंजा येथील प्रख्यात स्वामी नरसिंह सरस्वती त्यांच्या सात शिष्यांसह नागझरी येथे आले. त्यांनी महाशिवरात्रीच्या दिवशी गोदावरी स्नान घडावे, म्हणून त्यांनी गोदावरीला आवाहन केले. त्यानंतर तेथे गोदावरी आली आणि सोबतच नागेश्वर, त्र्यंबकेश्वर, विश्वेश्वर, सोमेश्वर आणि गुप्तेश्वर ही पाच स्वयंभू शिवलिंगे प्रगट झाली. कालांतराने याच ठिकाणी श्री गोमाजी महाराज नावाचे साक्षात्कारी संत अवतरले आणि त्यांच्याच प्रभावाने नागझरी हे गाव श्रीक्षेत्र म्हणून लौकिकास आले.

"देहू, आळंदी, पैठण, चाफळ, तेर वा अरण।
त्याच परीचें झालें आम्हां नागझरी स्थान।।"
[संत गोमाजी महाराज आरती: चरण क्र. ३ व ४.]

गुरू-शिष्याची यात्रा म्हणून प्रसिद्ध असलेल्या मुक्ताईनगर येथील मुक्ताई-चांगदेव यात्रा प्रसिद्ध आहे. या यात्रेसाठी संत गोमाजी महाराज यांची पालखी नागझरी येथून निघते. प्रस्थान ठेवल्यानंतर शेगावपासून ते मुक्ताईनगरपर्यंत प्रत्येक ठिकाणी पालखीची मानाची पूजा केली जाते. ही प्रथा वर्षानुवर्षे सुरू आहे. शेगाव संस्थानची खरी प्रगती ज्यांच्या मार्गदर्शनाखाली झाली, ते कर्मयोगी शिवशंकरभाऊ पाटील यांच्या कुटुंबीयांचे गुरू म्हणून श्री गोमाजी महाराज ओळखले जातात. शेगावच्या श्री गजानन महाराज संस्थानप्रमाणेच श्री गोमाजी महाराज संस्थानचा कारभारदेखील सचोटीने केला जातो. अनेक धार्मिक-आध्यात्मिक तसेच, समाजाभिमुख कार्यक्रम संस्थानद्वारे केले जातात. त्यामुळेच श्री गोमाजी महाराज संस्थानने पंचक्रोशीत स्वतंत्र ठसा उमटवला आहे. अलीकडच्या काळापर्यंत या गावात नैसर्गिक पाण्याचे झरे होते. त्यामुळे हे गाव "नागझरी" म्हणून ओळखले जाऊ लागले. श्री संत गोमाजी महाराजांचे भव्य मंदिर, अद्‌भूत गोमुख कुंड, स्वयंभू शिवलिंगाची पाच हेमाडपंथी शिवमंदिरे आणि निसर्गरम्य परिसर यामुळे नागझरी हे गाव एक तीर्थक्षेत्र तसेच, पर्यटन स्थळ म्हणून नावारूपास आले आहे. येथे दरवर्षी हजारो भाविक-पर्यटक येतात. त्यामुळे स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होतो.

"अवघ्या संता-ठायीं आम्हां तव हे द्वयचरण।
फार कशाला बोलावें हो तुम्हीच भगवान ।।"
(संत गोमाजी महाराज आरती: चरण क्र. ५ व ६.)

अशा शब्दांत गोमाजी महाराज यांची महती वरील आरती काव्यात वर्णिली आहे. !! गोमाजी महाराज यांच्या भक्तीमार्ग शिकवणीस त्यांच्या यात्रोत्सवानिमित्त त्यांना दंडवत प्रणाम !!

**- संकलन व सुलेखन -**
**संतचरणरज: श्रीकृष्णदास निरंकारी- बापू.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप-९४२३७१४८८३.**

# हिवरसिंगा येथे हरिनाम सप्ताहास सुरुवात



वादळवार्ता/शिरुर कासार

शिरूर कासार तालुक्यातील हिवरसिंगा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी ह.भ.प.महंत शांतिब्रम्ह भक्तिदासजी महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संतशिरोमणी सावता महाराज मंदिर कलश स्थापन वर्धापनदिनानिमित्त दि.११ एप्रिल ते १८ एप्रिल या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या २ वर्षापासून सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह गुरूवार दि.११ एप्रिल रोजी सुरु होत असून या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६ ते ७ विष्णूसहस्त्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण,१० ये १२ गाथाभजन, दुपारी २ ते ५ तुलशी संगीत रामकथा,सायं ५ ते ६ हरिपाठ व रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत हरिकिर्तन व नंतर हरी जागर होईल .आज रात्री विष्णू महाराज अंतरकर यांच कीर्तन होणार आहे. या सप्ताहाची सांगता गुरूवार दि.१८ रोजी सकाळी भव्य दिव्य नगर प्रदक्षणा निघेल व त्यानंतर सकाळी ११.०० ते ०१.०० या वेळेत ह.भ.प महंत शांतिब्रम्ह भक्तिदासजी महाराज शिंदे यांचे काल्याचे किर्तन होईल त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे तरी भाविक भक्तांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी हिवरसिंगा यांनी केले आहे.

## रमजान महिना व ईद निमित्ताने पाटोदा पोलीस स्टेशन ने ठेवली विशेष सुरक्षा

# ईदगाहवर भेटून मुस्लिम बांधवांना दिल्या शुभेच्छा



**वादळवार्ता/पाटोदा**

पाटोदा येथे ईदुल फितर सन मोठ्या उत्साहात साजरा झाला ईदगाह वर सामूहिक नमाजाचे पठण करण्यात आले यावेळी मौलाना अल्ताफ यांनी मुस्लिम समाजाला बंधू भावाची व शांतता व संयम ठेवण्याचं आवाहन केले या रमजान महिन्यामध्ये पाटोदा पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता रमजान महिना चालू झाल्यापासून पाटोदा शहरांमध्ये संध्याकाळच्या वेळेस रोजा इफ्तार च्या खरेदीसाठी रस्त्यावर विक्रेत्यांची व लोकांची गर्दी होत असल्याने पाटोदा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांनी दररोज सायंकाळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक असे पोलीस गस्त सुरू ठेवली... तसेच प्रत्येक शुक्रवारच्या नामाजाच्या ठिकाणी योग्य पोलीस बंदोबस्त नेमला....

पवित्र रमजान महिन्यांमध्ये रोजा ठेवणाऱ्यांसाठी पोलीस स्टेशन पाटोदा येथे पोलीस स्टेशन तर्फे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. सदर पार्टीमध्ये पाटोदा शहरातील हिंदू मुस्लिम ऐक्य दिसून आले .... तसेच रमजान ईद व महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती एकाच दिवशी व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती १४ एप्रिल रोजी साजरी होणार असल्याने पाटोदा शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची शांतता बैठक घेण्यात आली.

आज दिनांक ११/ ४ /२०२४ रोजी रमजान ईद निमित्त ईदगाह मैदान पाटोदा येथे मुस्लिम बंधूंना ईदच्या नमाज पठनाच्या वेळी पोलिसांचा योग्य बंदोबस्त लावण्यात आला होता तसेच नमाज झाल्यानंतर पाटोदा पोलीस स्टेशन चे सहा पोलीस निरीक्षक अनमोल केदार, पोलीस उपनिरीक्षक शगाडे,पोलीस उपनिरीक्षक काटकर, पोलिस अमलदार गडकर यांनी मुस्लिम बांधवांना ईद च्या शुभेच्छा दिल्या.. त्यावेळी माननीय तहसीलदार निलावाड साहेब, तसेच पाटोदा शहरातील पक्षाचे पक्ष पदाधिकारी सह प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार मुस्लिम बांधवांना सणाच्या शुभेच्छा दिल्या ..

## अंतरवली सराटीतील लाठीचार्ज लक्षात ठेवा - रोहन गलांडे पाटील (मराठा बांधवांनो मराठा आरक्षण विरोधी उमेदवार पाडा )

**वादळवार्ता/केज**



बीड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज पहायला गेलो तर लोकसभेचे राजकीय पक्षाचे उमेदवार घोषित केले गेले आहेत व आज घोषीत उमेदवार अहो रात्र दीवस आपल्या प्रचारात मग्न आहेत परंतु मराठा बांधवांना हात जोडून प्रत्येक मराठा बांधवांच्या चरणी नतमस्तक होऊन आपला एक मराठा बांधव म्हणून सकल मराठा समाज बांधवच्या चरणी नतमस्तक होऊन सांगतो की आपल्या मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाचा लढा उभारल्यावर आपल्या मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांचे अमरण उपोषण सुरू असताना जो लाठीचार्ज झाला त्या आपल्या माता माउलींच्या रक्त सांडले व त्यावेळी सकल महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या डोळ्यात पाणी आले होते त्यांची जान ठेऊन सकल मराठा समाजाने आरक्षणाच्या लढ्यात सत्तेवर बसुन आपल्या समाजाची हानी केली अशा पक्षाचे उमेदवारांना निवडून दिले नाही पाहिजे व आता लोकसभेसाठी रिंगणात उतरलेल्या योग्य उमेदवाराला निवडून द्या व आपन एक मतदार म्हणून आपल्या बीड लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या आपल्या समाज बांधवांस प्राधान्य दिले पाहिजे जो की उद्या मराठा आरक्षणासाठी अहोरात्र मेहनत करून सकल मराठा समाजाला सगेसोयरे कायदाची अंमलबजावणी करण्यात यावी म्हणून कायम मराठा समाजाच्या पाठीशी उभा राहिल अशा मराठा समाज बांधव लोकसभेच्या उमेदवार आहे त्यांच उमेदवारांला प्राधान्य द्यावे योग्य वेळी योग्य चिन्ह समोरील बटन दाबून बीड लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या केज तालुक्यातील मराठा समाज बांधवांला खासदार करावे व जो उमेदवार आजपर्यंत अंतरवली सराटीतील उपोषणावर आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलन तर सोडाच विरोध मात्र सातत्याने केला व मराठा समाज बांधवावर सत्तेचा माज दाखवत गुन्हे दाखल केले अशा मराठा समाज विरोधी उमेदवाराला पाडावे असे मत रोहन गलांडे पाटील यांनी व्यक्त केले गेले आहे.



चौसाळा येथिल हजरत सैलानी बाबा उर्स निमित्त कुस्तयांचा जंगी सामना आयोजित केला होता यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणुन युवा नेते डॉ .योगेश क्षीरसागर हे यावेळी त्यांचा कमिटीच्या वतीने शाल श्रीफळ देवुन सत्कार करताना आमोल कांबळे,पवन कुचेकर,सुरज सोनवणे,स्वपनील सोनवणे,अकबर जहागिरदार यांच्यासह नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# शहरवासीयांनो पाण्यासाठी ही कसरत पाहा, निसरड्या वाटेवरुन लहान मुलांसोबत दोन किमी पायपीट, शेवटी मिळते हंडाभर गढूळ पाणी

**वादळवार्ता/इगतपुरी**

पावसाचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या इगतपुरीत एप्रिल महिन्यातच भीषण पाणी टंचाई सुरु झाली आहे. या भागातील आदिवासी नागरिकांना आतापासून पाण्याच्या टंचाईला सामोरे जावे लागत आहेत. एका हंडाभर पाण्यासाठी दोन किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. त्यानंतर गढळू पाणी मिळत आहे. इगतपूर तालुक्यात पावसाळ्यात सुमारे चार हजार मिमी पाऊस पडत आहे. त्यानंतरही पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे पाणी टंचाईच्या झळा आतापासूनच सुरु झाल्या आहेत. नगरपरिषद हद्दीत पाणी टंचाई भावली धरणातून १६ कोटी रुपये खर्च करुन इगतपुरी शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याची पाईपलाईन घेतली आहे. मात्र तरीही इगतपुरी शहरात गेल्या पाच वर्षांपासून आठवड्यातून फक्त तीन दिवस पाणी पुरवठा केला जात आहे. तर इगतपुरी नगरपरिषद हद्दीतील तळेगाव शिवारातील कातुरवाडी, वाघाचा झाप, मेंगाळ झाप या वस्तीमधील दोनशे ते अडीचशे लोकसंख्या वस्ती असलेल्या आदिवासी नागरिकांना भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. अंदाज चुकला तर अपघात इगतपुरी नगरपरिषदेच्या हद्दीत असणाऱ्या वाडीच्या नागरिकांना थेट दोन किमी लांब असलेल्या



घाटनदेवी मंदिर समोरील खोल उंट दरीतील झऱ्यातील गढूळ पाणी पिण्यासाठी आणावे लागत आहे. या वाडीपासून हा झरा जवळपास दोन किलोमीटर आहे. या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नाही. निसरडी वाट असलेल्या थेट खोल असलेल्या डोंगर दऱ्यातून एका हाताने आपल्या लहान लेकराला धरत दुसऱ्या हाताने डोक्यावरील हंडा सांभाळत हे पाणी आणावे लागत आहे. थोडाही अंदाज चुकला तर थेट दरीत कोसळण्याची शक्यता आहे. पाईपलाईन झाली पण पाणी कुठे मागील वर्षी येथील आदिवासी नागरिकांनी आंदोलन केल्यानंतर नगरपरिषदेने फक्त पाईपलाईन केली.

## कव्हे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रा उत्साहात संपन्न

*** दैनिक वादळ वार्ता सोलापूर/विश्वास चोपडे**

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील कव्हे या गावात श्री सिद्धेश्वर देवाची यात्रा भरते ही यात्रा दोन दिवस असते यावर्षी ही यात्रा बुधवार दिनांक ९ एप्रिल २०२४ रोजी भरली. ही यात्रा दोन दिवस असते दोन दिवस यात्रेकरूंनी याचा आस्वाद घेतला. सकाळी देवाला आहेर चढवला. श्री सिद्धेश्वर यात्रेचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे सर्वजण सहकुटुंब शेरनी घेऊन जातात शेरनी वाजत गाजत ढोल ताशाच्या आवाजात नेहाली जाती व सिद्धनाथाच्या नावानं चांगभलं या गजरात नेहली जाते. शेरनी म्हणजे पेढा किंवा साखर देवाला नैवेद्य दाखवल्यानंतर सर्व भक्तगण दर्शन घेऊन मंदिराच्या बाहेर आल्यानंतर ती शेरनी भक्तांना ती वाटली जाते. यामध्ये पेढा मिठाई बर्फी खेळणी लहान मुलांसाठी पाळणे अशी अनेक दुकाने मोठ्या प्रमाणात होती. दरवर्षीप्रमाणे संध्याकाळी बाराच्या नंतर रथामध्ये देवाची मिरवणूक काढली रथाच्या पुढे ढोल ताशा बँड व नृत्यांगना अशामध्ये ती सकाळी मंदिरामध्ये पोहोचली यात्रा उत्सवात कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून यात्रा काळात पोलिसांचा बंदोबस्त करण्यात आला होता.तसेच श्री सिद्धेश्वर यात्रा पंच कमिटीनी कव्हेकरांच्या सुरक्षेची काळजी घेतली. दुसऱ्या दिवशी सकाळी १२ ते ४ वाजेपर्यंत कलगी तुऱ्याचा कार्यक्रम झाला .त्यानंतर चार वाजल्यानंतर कुस्त्यांचा कार्यक्रम घेतला गेला. हा कार्यक्रम प्रबोधनकार ठाकरे विद्यालयाच्या प्रांगणात झाला. यामध्ये लहान मुलांना प्रोत्साहित



करण्यासाठी त्यांच्या कुस्त्या प्रथम घेतल्या गेल्या त्यांना योग्य ते बक्षीस दिले. त्यानंतर मोठ्या कुस्त्या लावल्या. यामध्ये दरवर्षीप्रमाणे प्रथम क्रमांकासाठी श्री. सिद्धेश्वर केसरी गदा प्रदान करण्यात येते व रोख रक्कम देण्यात येते याही वर्षी दोन पैलवानामध्ये कुस्ती होती पै.मनीष रायते व पै.कालिचरण सोळंकर परंतु ही कुस्ती जास्त वेळ चालली त्यामुळे त्यांना पाच मिनिटाचा टायमिंग देण्यात आला परंतु तरीही कुस्ती झाली नाही. परत त्यांना पॉईंट वर कुस्ती देण्याचे ठरले पाच मिनिटात ही त्यांना पॉईंट निघाला नाही. त्यानंतर तीन मिनिटांचा टाईम देण्यात आला त्यावेळेस ही कुस्ती झाली नाही. त्यामुळे कुस्ती जोडीवर सोडण्यात आली व ३४००० रुपये (चौतीस हजार रुपये ) रोख रक्कम त्यांना विभागून देण्यात आली. व चांदीची गदा पुढील वर्षासाठी ठेवण्यात आली.

यात्रा उत्साहात व सुसरक्षित पार पडली. गावकऱ्यांनी सर्व पंच कमिटीचे आभार मानले.

## अंबाजोगाईत ईद-उल-फित्र ची नमाज उत्साहात साजरी सामाजिक सलोख्याचे अंबाजोगाईत दर्शन

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

एक महिन्यापासून सुरू असलेल्या रमजानच्या रोजाची गुरुवारी ईद-उल-फित्र च्या नंतर मुस्लिम समाजाच्या रोजाची सांगता केली आहे. अंबाजोगाईतील सर्व मुस्लिम समाज बांधवांनी ईदगाह मैदान वर जाऊन ईद -उल -फित्र ची नमाज आदा केली. त्यानंतर आल्ला कडे दुवा केली या दुवात प्रमुख्याने हिंदू मुस्लिम भाई चारा आखंडीत राहावा या करिता शहरातील मांडवा पठाण ईदगाह मैदान, चांद मारी मैदान, किरमानी बाबा दर्गा ईदगाह,मरकज मज्जिद आदी ठिकाणी नमाज आदा केली. यावेळी हजारो, मुस्लिम बांधवाना शुभेच्छा देण्या करिता सर्व पक्षाचे राजकीय



नेते,कार्यकर्ते, व्यापारी, सर्व समाजातील नागरिक भूसंख्येने उपस्थित होते.

स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती दिनानिमित्त वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून करताना वंचितचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटील, डॉ.नितीन सोनवणे, ज्ञानेश्वर कवठेकर,बबन वडमारे महिला जिल्हाध्यक्षा अँड.अनिता चक्रे, डॉ. छाया हिरवे, पुष्पा तुरुकमारे, पुरुषोत्तम वीर, युनूसभाई शेख,एक.बी. जौजाळ,ए.एम.सोनवणे, संदिप जाधव,वडमारे,पैवळे आदी उपस्थित होते.



# माझ्या नादी लागू नका, आम्ही कपडे फाडण्यात एक्सपर्ट, प्रकाश आंबेडकर यांचा सर्वात मोठा इशारा

**वादळवार्ता/आष्टी**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी अकोला येथे पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांना मोठा इशारा दिला. विजय वडेट्टीवार यांनी वंचित बहुजन आघाडीला पाहिजे तेवढा हुंडा मिळत नसल्याने ते महाविकास आघाडीत आले नाहीत, असे विधान केले होते. यावर प्रकाश आंबेडकर यांनी उत्तर दिलं आहे. “निवडणुकांमध्ये जागांचा समझोता होता. आपण बघू शकतो की, कालपर्यंत महाविकास आघाडीचे जागावाटप झाले नव्हते. त्यामुळे अशा लोकांनी हुंड्याची चर्चाच करू नये. आम्ही काढायला गेलो की इतर जणांना सार्वजनिक फिरायला कठीण जाईल. माझ्या आणि वंचित बहुजन आघाडीच्या नादी लागू नका, आम्ही कपडे फाडण्यात एक्सपर्ट आहोत”, असा इशारा प्रकाश आंबेडकर यांनी दिला ‘राज ठाकरेंनी भाजपला पाठिंबा दिल्याने उत्तर भारतीय असुरक्षित’मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठिंबा दिला आहे. त्यामुळे बिहारमधील कार्यकर्ते जे मुंबईमध्ये राहतात आणि दक्षिणेतील जे कार्यकर्ते आहे, ज्यांना भाजप जवळची वाटत होती त्यांना असुरक्षित वाटू लागले आहे, असा दावा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी अकोला येथील पत्रकार परिषदेत केला आहे. मुंबईसारख्या शहरात मनसे किंवा शिवसेना यांनी अगोदर आंदोलन उभे केले



होते. ते म्हणजे लुंगी हटाव, पुंगी बजाव. त्यानंतर उत्तर भारतीयांच्या विरोधातले आंदोलन उभे केले. मनसेने धारावी या ठिकाणी छट पूजेला विरोध केला आणि बिहारमधील लोकांना मारल्याची आठवणही आंबेडकर यांनी करुन दिली.प्रकाश आंबेडकर यांचा ठाकरे आणि पवारांवर आरोप“सांगलीचे राजकारण तापलेले असताना आंबेडकर म्हणाले की, सांगलीमध्ये शिवसेनेचे काहीच नव्हतं, पण राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मिळून ती जागा घेतली. आज सकाळीच काँग्रेस नेते विशाल पाटील यांचे बंधू प्रतीक पाटील यांनी माझी भेट घेतली आणि चर्चाही केली. लवकरच विशाल पाटील निर्णय घेतील”, अशी अपेक्षाही आंबेडकरांनी व्यक्त केली. मुंबईच्या जागा जाणीवपूर्वक जाहीर केल्या नाहीत’मुंबईचे उमेदवार आम्ही जाणीवपूर्वक जाहीर केले नाहीत. त्याचे कारण की, निवडणूक सुरू झाल्यानंतर मनसेचा पाठिंबा भाजपवाले घेतील. ते झालं की, मुंबईमधील पूर्ण गणित बदलते त्यासाठी आम्ही थांबलो होतो. उद्या संध्याकाळपर्यंत आम्ही मुंबईमधील उमेदवार जाहीर करणार असल्याचेही आंबेडकर म्हणाले.

## राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची अंबाजोगाई शाखेची कार्यकारिणी जाहीर.

**अंबाजोगाई प्रतिनिधी :-** राज्यासह राष्ट्रीय पातळीवर पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे व त्यांच्या न्याय हक्कासाठी लढत असलेल्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची अंबाजोगाई शाखेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. दिनांक 05 एप्रिल रोजी अंबाजोगाई येथे राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या नवीन 2024 कार्यकारिणी निवडीची बैठक जिल्हाध्यक्ष डी.एम. मुजमुले यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.त्यामध्ये संघाचे राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी,राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे, राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य अध्यक्ष संतोष जाधव ,राज्यसचिव निलेश ठाकरे,मराठवाडा अध्यक्ष शंकरसिंह ठाकूर यांच्या आदेशानुसार अंबाजोगाई तालुकाध्यक्ष पदी सालेम पठाण यांची निवड करण्यात आली. त्याचबरोबर सचिव पदी अशोक वाघमारे(कोळी), उपाध्यक्ष पदी अनिरुद्ध पांचाळ,सहसचिव पदी दत्तात्रय खोगरे,कोषाध्यक्ष पदी ताहेर अमिरहमजा पटेल, संघटक म्हणून शेख अहेमद यांची निवड जिल्हाध्यक्ष डी. एम.मुजमुले यांनी नियुक्तीपत्र देऊन केली.त्याचबरोबर इतर पदाधिकाऱ्यांची सदस्य पदी, गोविंद सूर्यवंशी, बाळासाहेब ढगे, किरण साळुंके, संतोष कोळी, आलम पठाण यांची निवड करण्यात आली.तसेच बीड जिल्हा संघटक पदी सुग्रीव क्षीरसागर यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल मित्रपरिवार व पत्रकार बांधवांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

## केज येथे राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या कार्यालयाचे भव्य उद्घाटन संपन्न.




**केज :- प्रतिनिधी** पत्रकारिता क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकार बांधवांसाठी एक हक्काचे व्यासपीठ (ठिकाण) असावे यासाठी पुरोगामी पत्रकार संघाच्या कार्यालयाचे कळंब रोड, केज या ठिकाणी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य उद्घाटन करून शुभारंभ करण्यात आला.


राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे मराठवाडा उपाध्यक्षपदी पत्रकार मुबाशीर खातीब यांची निवड करण्यात आली.तसेच पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांची निवड करण्यात आली. याबद्दल केज येथील पुरोगामी पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. तसेच राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आदर्श शिक्षक अमजद खतीब सर व ज्येष्ठ पत्रकार रामदास तपसे यांच्या हस्ते पुरोगामी पत्रकार संघाच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुरोगामी पत्रकार संघाचे अध्यक्ष रंजित घाडगे यांनी केले. तर मराठवाडा उपाध्यक्ष मुबाशीर खतीब व बीड जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय मुजमुले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते अशा पत्रकारांसाठी तालुक्यावर बसण्याचे ठिकाण असले पाहिजे. यासाठी पुरोगामी पत्रकार संघाचे कार्यालय केज येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक कळंब रोड या ठिकाणी करण्यात आले.

यावेळी पत्रकार दिनकर जाधव, अनिल वैरागे, रामदास तपसे, आदर्श शिक्षक अमजद खतीब सर, सलीम सय्याद खमर मोहजन तात्या गवळी, अदर्श शिक्षक वाहाज अनसारी सर सोनू गायकवाड, चंद्रकांत पाटील, अनिल गलांडे, शाहेद खतीब रोहन गलांडे, मेटे, सावंत, महादेव काळे, बाळासाहेब शहेनवाज इनामदार जाधव, गौतम बचुटे, महादेव गायकवाड, संतोष गालफाडे,सनी शेख अरबाज खतीब, दिनकर राऊत,अमोल सावंत,केज तालुक्यातील विविध पत्रकार जेष्ठ मंडळी मोठ्या संख्येने इतरजन उपस्थित होते.

## अंबाजोगाई शहरासह तालुक्यात विजेच्या कडकडाटासह पावसाची जोरदार हजेरी.

**अंबाजोगाई प्रतिनिधी :-** हवामान विभागानं वर्तविलेल्या अंदाजानुसार, अंबाजोगाई शहरांसह परिसरात बुधवारी आणि गुरुवारी विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावली. मागील काही दिवसांपासून प्रचंड उकाडा वाढल्याने नागरिक त्रस्त झाले होते. मात्र, बुधवारी



सायंकाळी आलेल्या अवकाळी पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाल्यानं नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली. आज दिनांक 11 एप्रिल रोजीही दुपारच्या सुमारास विजांच्या कडकडाटात अंबाजोगाई शहरांसह तालुक्यात पावसाने झोडपले. त्यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. दरम्यान, हाती आलेल्या माहितीनुसार बीड जिल्ह्यातील अनेक भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे.. यामुळे शेतकऱ्यांच्या भाजीपाला आणि आंब्याचे मोठं नुकसान झाले आहे. झाडावर पडली वीज बुधवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी पावसात अंबाजोगाई तालुक्यातील सुगाव या गावी झाडावर वीज पडली. वीज पडताच झाडाने पेट घेतला, या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे.

## माजलगांव पत्रकारांच्या वतिने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती साजरी



**वादळवार्ता/माजलगांव**

थोर समाज सुधारक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. माजलगांव येथील पत्रकार बांधवांच्या वतीने महात्मा ज्योतीबा फुले यांच्या १९७ व्या जयंती निमित्त दिनांक ११ एप्रिल २०२४ गुरुवार रोजी व्यंकटेश हॉल माजलगांव येथे अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार विष्णु उगले होते , तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार किशोर प्रधान , अरविंद ओव्हाळ , परमेश्वर सोळंके , बाळासाहेब अडागळे , पृथ्वीराज निर्मळ यांची उपस्थिती होती. सर्व पत्रकारांच्या वतिने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रसंगी पत्रकार अमर साळवे , संतोष रासवे , राजरतन डोंगरे , दर्शन डोंगरे , सिद्धेश्वर गायकवाड , विजय डावरे , बालासाहेब उफाडे , धनंजय माने , दिगंबर गिरी , वैभव झगडे यांची उपस्थिती होती.

# वीज कोसळून गाय ठार-सोयगाव तालुक्यातील सहा वाजेची घटना

**वादळवार्ता/सोयगाव**

सोयगावसह परिसरात सुरू असलेल्या विजांच्या कडकडाटात सह अवकाळी पावसात अचानक वीज कोसळून गाय ठार झाल्याची घटना गुरुवारी (ता.११) सायंकाळी सहा वाजता निमखेडी (ता सोयगाव)शिवारात घडली शेतकरी आबा महदू काटे हे शेतात असताना त्यांनी शेतात गट क्र-७८ मध्ये चरण्यासाठी दावणीला गाय बांधलेली होती सायंकाळी सुरू असलेल्या अवकाळी पाऊस सुरू असल्याने शेतकरी आबा काटे हे दूर असताना अचानक वीज कोसळून झाडाखाली बांधलेली गाय ठार झाली आहे दरम्यान घटनेची माहिती महसूल च्या आपत्ती निवारण कक्षात देण्यात येऊन घोसला सज्जा चे तलाठी गणेश फरकांडे यांनी घटनेचा पंचनामा केला असून रात्री उशिरापर्यंत मृत गाईचे शवविच्छेदन करण्यात आले दरम्यान वीज कोसळून गाय ठार झाल्याने शेतकऱ्यांचे पन्नास हजार रु चे नुकसान झाल्याचा अहवाल जिल्हा आपत्ती निवारण कक्षात पाठविण्यात आला आहे अशी माहिती तलाठी गणेश फरकांडे यांनी दिली ----सोयगावसह परिसरात अकरा गावात गुरुवारी सायंकाळी अवकाळीच्या पावसाने विजांच्या कडकडाट मध्ये तासभर तडाखा दिला यामध्ये कापणी केलेल्या ज्वारी,बाजरीचे नुकसान झाले असून जनावरांच्या




चाऱ्या चे नुकसान झाले आहे शासनाने जनावरांना चाऱ्यासाठी मदत द्यावी अशी मागणी ज्ञानेश्वर युवरे यांनी केली आहे घोसला, नांदगाव तांड्यात अवकाळीच्या पावसाचा जोर अधिक होता त्यामुळे पिकांचे नुकसान झाले आहे ....

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रक ग्ु राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )